# महाराष्ट्र विधानपरिषद
## दुसरे अधिवेशन, २०२५
## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ / आषाढ १९, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(४)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

### मुंबईतील नवीन इमारतीत मराठी माणसांसाठी घरांचे ५० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत

**(१) * ३११९ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांसाहार करणाऱ्या मराठी माणसाला नवीन इमारतीत घरे नाकारणे, विकासकांकडून मराठी माणसाची होणारी अडवणूक यावर पर्याय म्हणून मुंबईत नवीन इमारतीत घरांची विक्री सुरू झाल्यानंतर एक वर्षापर्यंत मराठी माणसासाठी घरांचे ५० टक्के आरक्षण ठेवण्यात यावे आणि एका वर्षानंतर या घरांची विक्री न झाल्यास विकासकांना ती कोणालाही विकण्याची मुभा द्यावी, अशी मागणी 'पार्ले पंचम' या सामाजिक संस्थेने मा.गृहनिर्माण मंत्री महोदयांकडे दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी वा तत्पूर्वी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनात केलेल्या मागणीनुसार मुंबईत मराठी माणसासाठी एका वर्षापर्यंत नवीन इमारतीतील घरांचे ५० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाने कोणता सकारात्मक निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) यासंदर्भात संबंधित संस्थेकडून कोणतेही निवेदन गृहनिर्माण मंत्री महोदयांकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. मुंबईत मराठी माणसांकरीता घरांची विक्री करताना ५० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत कोणताही प्रस्ताव शासनाकडे प्राप्त नाही.

(३) प्रश्न उध्दभवत नाही.

----------------

## सिडको मुख्यालय, नवी मुंबई येथील पारसिक टेकडीवर अनधिकृतपणे वृक्षतोड करण्यात आल्याबाबत

**(२) * २५५७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील सिडको मुख्यालयाजवळील पारसिक टेकडीवरील १०० हून अधिक वृक्ष अनधिकृतपणे तोडण्यात आल्यामुळे सायन-पनवेल मार्गावर भूस्खलनाचा संभाव्य धोका निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत वृक्षतोडीबाबत स्थानिक नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत असून, संबंधितांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई येथील सिडको मुख्यालयाजवळील पारसिक टेकडीवरील अनधिकृतपणे केलेल्या वृक्ष तोडीबाबत संबंधितांवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) नवी मुंबई मधील सीबीडी बेलापूर येथील उरण फाटा येथे पारसिक हिलवर वृक्ष तोड झाल्याची बाब मार्च महिन्याच्या अखेरीस सिडकोच्या निदर्शनास असल्यानंतर वृक्ष अधिकारी यांचेमार्फत स्थळ पहाणी करण्यात आली. सदर ठिकाणी उच्च विद्युत वाहिनी पॉवर कॉरीडॉर आहे. सदर पॉवर कॉरीडॉरमध्ये उच्च विद्युत दाबाच्या वाहिन्या असून या वाहिन्यांद्वारे मुंबई व मुंबई उपनगर यांस विज पुरवठा होत असल्याने वृक्षांमुळे / झाडांमुळे अपघात किंवा अडथळा निर्माण झाल्यास विद्युत पुरवठा खंडीत होऊ शकतो. सबब, सदर वाहिन्यांखालील वृक्षांची नियमित छाटणी आवश्यक आहे. सदर कॉरीडॉरखालील ग्लिरिसिडिया जातीची झुडपे छाटल्याचे आढळून आले. सदर छाटणी MSETCL यांचेमार्फत करण्यात आली आहे.

तसेच, कार्यकारी अभियंता, वाशी, सिडको यांनी केलेल्या स्थळ पहाणीनंतर भूस्खलनाचा कोणताही धोका नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३) * २४४३ श्री.अंबादास दानवे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण ते छत्रपती संभाजीनगर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम ठेकेदारामार्फत सुरू असून संबंधित कामाची मुदत संपूनही अद्याप कामे अपूर्ण असल्याचे व त्यामुळे गत वर्षभरात या रस्त्यावर झालेल्या अपघातांमध्ये १५ हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या विविध ठिकाणी दुभाजकांची चुकीची रचना, दिशादर्शक फलकांचा अभाव, अपूर्ण पूल व अर्धवट एकेरी वाहतूक यामुळे वाहनधारक व प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे तसेच जायकवाडी येथील राहुलनगर परिसरात अपूर्ण रस्त्यामुळे एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिंपळवाडी, कारखाना, चितेगाव परिसरात ठेकेदारांच्या मनमानीमुळे गावाकडे जाणारे रस्तेही अद्याप अपूर्ण असून या भागातील नागरिक व विद्यार्थी यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठवाडा विभागातील दळणवळण व औद्योगिककरणाच्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगर ते पैठण तसेच छत्रपती संभाजीनगर ते वाळूज महानगर आणि छत्रपती संभाजीनगर ते दौलताबाद टी पॉइंट पर्यंतच्या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) असल्यास, अपूर्ण रस्त्यांच्या कामांमुळे अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने स्थानिक नागरिकांनी व काही सामाजिक संस्था यांनी तक्रारी करुनही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे ठेकेदारांशी आर्थिक हितसंबंध असल्याने या अपूर्ण कामांबाबत कोणतीही कारवाई अथवा नियोजनबध्द कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदारास काळ्या यादीत टाकणे, तसेच अनेक तक्रारी करुनही दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-ई छत्रपती संभाजीनगर ते पैठण रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत अतिरिक्त भूसंपादन न करता प्रगतीपथावर असून सदर महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात चालू आहे.

सदर चौपदरीकरणाची मुदत दिनांक २७/०७/२०२४ पर्यंत होती. परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत टाकण्यात येणाऱ्या २५०० मी.मी. व्यासाच्या पाईपलाईनच्या कामामुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२-ई चे चौपदरीकरणात काही ठिकाणी अडथळे निर्माण होत असल्याकारणाने काम वेळेत पूर्ण होऊ शकत नसल्यामुळे सदर कामास मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

पोलीस विभागाच्या अहवालानुसार माहे एप्रिल २०२४ ते जून २०२५ या कालावधीमध्ये सदर रस्त्यावर एकूण २१ व्यक्ती मयत झाल्याची नोंद आहे. महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामावेळी रस्ता वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे.
(२) सदरील महामार्गावरील दुभाजकाची रचना I.R.C. च्या मानकाप्रमाणे करण्यात आलेली आहे.

महामार्गाच्या लगत महाराष्ट्र जीवन प्राधिरणामार्फत टाकण्यात येणाऱ्या २५०० मी.मी. व्यासाच्या पाईपलाईनच्या प्रलंबित कामामुळे काही ठिकाणी रस्त्याची लांबी वगळण्यात (Descope) आलेली आहे. सदर लांबीमध्ये एकेरी वाहतूक सुरू असून रस्ता सुरक्षा विषयक उपाययोजनांची पूर्तता करण्यात आलेली आहे. तसेच वगळयात आलेली (Descope) लांबीसोडून उर्वरीत लांबीमध्ये महामार्गावर असलेल्या पुलांचे काम पूर्ण झालेले आहे. वगळयात (Descope) आलेल्या लांबीमध्ये अपघात टाळणे करीता आवश्यक ठिकाणी सूचनादर्शक फलक उभारण्यात आलेले आहेत.

महामार्गावर चौपदरीकरणाचे कामामुळे अपघात टाळण्याच्या दृष्टीने जोडरस्ता असलेल्या जायकवाडी येथील राहुलनगर परिसरातील जाणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आलेले असून सदर ठिकाणी योग्य दिशादर्शक फलक उभारण्यात आलेले आहेत.

(३) पिंपळवाडी व कारखाना येथील गावाकडील जाणारे सर्व रस्ते महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामात जोडून देण्यात आलेले आहेत. तसेच, सदर ठिकाणी अपघात टाळणे करीता योग्य त्या सुरक्षा उपाययोजना व दिशादर्शक फलक उभारण्यात आलेले आहेत.

मौजे चितेगांव परिसरातील काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत २५०० मी.मी. व्यासाच्या पाईपलाईनच्या कामामुळे दिरंगाई होत असल्याकारणाने (Descope) करण्यात आलेले होते. सदर ठिकाणी कामासाठी नव्याने निविदा अंतिम करून नवीन ठेकेदाराची नेमणूक करण्यात आलेली असून नवीन ठेकेदारामार्फत सदर काम हाती घेण्यात आलेले आहे.

(४) छत्रपती संभाजीनगर ते पैठण राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-ई रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम प्रगतीत आहे.

छत्रपती संभाजीनगर (नगर नाका) ते वाळूंज हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून या रस्त्यापैकी ४ कि.मी. लांबीमध्ये ६ पदरी व १.५० कि.मी. लांबीमध्ये ४ पदरी काम पूर्ण झालेले आहे.

छत्रपती संभाजीनगर ते दौलताबाद टी पॉईंट राज्यमार्ग क्र.१६ रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम मंजूर असून सदर कामाची निविदा स्विकृतीबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) व (६) छत्रपती संभाजीनगर ते पैठण या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत असलेल्या कामापैकी ९० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीत आहे.

छत्रपती संभाजीनगर ते दौलताबाद टी पॉईट राज्यमार्ग क्र.१६ रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाच्या निविदा प्रक्रियेस मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. तथापि, मा.उच्च न्यायालयाने सदर स्थगिती खारिज केली असल्याने निविदेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे. न्यायालयीन प्रकरणामुळे निविदा प्रक्रियेस विलंब झाला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) या संस्थेने गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण करताना पायाभूत सुविधांचा समावेश करण्याबाबत

**(४) * २४९८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे (म्हाडा) १९ हजार ४९७ घरे बांधण्याचे उद्दीष्ट देण्यात आले असून, म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांत वीज, पाणी, रस्ते, शाळा आणि महाविद्यालयांसह अनेक पायाभूत सेवासुविधांचा समावेश नसल्याने सदर प्रकल्पात घर खरेदीदार गुंतवणूक करीत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरांचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासह अनेक पायाभूत सुविधांचा समावेशही महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणांतर्गत करण्याच्या दृष्टीने शासन विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, कोकण म्हाडाअंतर्गत लॉटरीमध्ये काढलेली घरे विकासकाने निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा अधिक किंमतीने विक्री केल्याचे निदर्शनास आले असून म्हाडाच्या घरांसाठी रेरा कायद्याची अंमलबजावणी होते काय,
(४) असल्यास, राज्यातील महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण या शासकीय संस्थेने गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण करताना त्यात अनेक पायाभूत सुविधांचा समावेशही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत बांधण्यात आलेल्या गृहप्रकल्पांमध्ये वीज, पाणी, रस्ते इ. पायाभूत सेवांचा समावेश करण्यात येतो.
(३) अशी बाब निदर्शनास आली नसल्याचे म्हाडा प्राधिकरणाने कळविले आहे.
(४) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर व प्रस्तावित गृहनिर्माण योजनांमध्ये आवश्यक सोयी सुविधांचा समावेश करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेला कंत्राटी कर्मचारी पुरवठा करणाऱ्या कंपनीच्या ठेकेदारांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(५)** * **२४२८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने कंत्राटी कर्मचारी पुरवठा करणाऱ्या महाराणा सिक्युरिटी ॲड लेबर सप्लायर्स, गॅलेक्सी एजन्सी व अशोका एजन्सी या कंपन्यांना कंत्राट दिले असून, सदर एजन्सीजमार्फत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेला २००० कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविले जात असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीच्या ठेकेदारांना कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेतन देण्याकरीता गत दीड वर्षात रुपये २४ कोटी एवढी अतिरिक्त रक्कम दिली असून, सदर ठेकेदार प्रत्येक महिन्यात कंत्राटी कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या वेतनाची जादा रक्कम दाखवत असल्याची बाब कंत्राटी कर्मचाऱ्यांनी माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान तेथील आयुक्तांच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठेकेदाराने अद्याप कंत्राटी कर्मचाऱ्यांना भविष्यनिर्वाह निधीची रक्कम दिली नसून शासनाचा जीएसटी कर ही भरला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या ठेकेदारांवर तसेच संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया राबवून बाहयस्त्रोताव्दारे कर्मचारी पुरवठा करण्याकरीता ०३ एजन्सींची नियुक्ती केलेली आहे.

आज रोजी महानगरपालिकेत महाराणा सिक्युरिटी ॲड लेबर सप्लायर्समार्फत १७१७, गॅलेक्सी एजन्सीमार्फत १०१ तर अशोका एजन्सीकडून २२१ असे एकूण २०३९ बाह्यस्त्रोताव्दारे कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

यासंदर्भात बाह्यस्त्रोताद्वारे कार्यरत कर्मचाऱ्यांच्या मानधनाबाबत महानगरपालिकेकडून आढावा घेण्यात आला असता बाह्यस्त्रोताद्वारे कर्मचारी पुरवणाऱ्या एजन्सींना महानगरपालिकेकडून अदा करण्यात येणारी रक्कम व या एजन्सीकडून प्रत्यक्ष कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी मानधनाची रक्कम यात प्रथमदर्शनी तफावत दिसून आलेली आहे.

याबाबत महानगरपालिकेने संबंधित एजन्सींकडून खुलासा मागविला असून त्यांनी सादर केलेल्या खुलाशांच्या अनुषंगाने सदर एजन्सींना अदा करण्यात आलेल्या रकमेबाबत महानगरपालिकेच्या लेखापरीक्षण विभागाकडून पडताळणी सुरु आहे.

(३) महानगरपालिकेकडून प्रत्येक महिन्यांचे बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांचे देयक अदा करताना लगतच्या महिन्याच्या पूर्वीच्या महिन्याची भविष्य निर्वाह निधी भरलेल्या चलनाची प्रत सोबत जोडल्याची खात्री करण्यात येते. तथापि, महाराणा सिक्युरिटी ॲड लेबर सप्लायर्सबाबत भविष्य निर्वाह निधीची रक्कम जमा न केल्याची नियुक्त कर्मचाऱ्यांची तक्रार असून सदर एजन्सीला भविष्यनिर्वाह निधीची रक्कम जमा करण्याबाबत व रकमेचा भरणा न केल्यास कारवाई करण्यात येईल, असे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

तसेच जीएसटीबाबत बाह्यस्त्रोताद्वारे कर्मचारी पुरवठा करणाऱ्या एजन्सीला जीएसटी लागू नसल्याची महानगरपालिकेची धारणा असल्यामुळे महानगरपालिकेने जीएसटी कपात केलेली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) या प्रकरणी सदर तीन एजन्सींना अदा केलेल्या देयकांच्या संदर्भात महानगरपालिकेच्या लेखा परीक्षण विभागामार्फत पडताळणीचे काम सुरु आहे. पडताळणीअंती प्राप्त निष्कर्षाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बांद्रा (मुंबई) येथील भाभा रुग्णालयातील रक्तपेढी पूर्णवेळ कार्यरत ठेवण्याबाबत

**(६) * २८८० ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयाच्या (के.ई.एम.) रक्तपेढीतील ५३ टक्के कर्मचाऱ्यांना अन्न व औषध प्रशासनाकडून मान्यता मिळाली नसतानाही बेकायदेशीरपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये वैदयकीय अधिकाऱ्यांसह तंत्रज्ञांचाही समावेश असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांद्रा (मुंबई) येथील भाभा रुग्णालयातील के.बी भाभा रक्तपेढी ही पुरेसे तंत्रज्ञ असूनही दुसऱ्या व तिसऱ्या पाळीमध्ये बंद ठेवली जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने सहा तंत्रज्ञांना रक्तपेढीमध्ये काम करण्यासाठी मान्यता व नियुक्ती दिली असूनही प्रत्यक्षात फक्त दोन तंत्रज्ञ पूर्णवेळ कार्यरत असून उर्वरित चार तंत्रज्ञ हे प्रत्यक्षात पॅथॉलॉजी प्रयोगशाळेत कार्यरत आहेत तसेच गरजू रुग्णांना रक्ताची तात्काळ उपलब्धता व्हावी याकरीता २४ तास रक्तपेढया सुरु राहणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरिकांच्या तक्रारीनंतर याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीनुसार संबंधित दोषींवर तसेच बेकायदेशीरपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राजा एडवर्ड स्मारक रुग्णालयाच्या रक्तपेढीत वैध अन्न औषध प्रशासनाकडून परवाना प्राप्त असे एकूण २२ कर्मचारी असून, त्यामध्ये वैद्यकीय अधिकारी-०५, तांत्रिक पर्यवेक्षक-०४ व तंत्रज्ञ-१३ यांचा समावेश आहे. इतर पात्र कंत्राटी बी.एस.सी. व डी.एम.एल.टी. पदवी धारक तांत्रिक कर्मचारी आहेत, ज्यांची रक्तपेढी सुरळीत चालण्यासाठी मदत घेतली जाते. ते मान्यताप्राप्त तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली काम करतात. रक्तपेढीमध्ये एकही अपात्र व अमान्यता प्राप्त अधिकारी कर्मचारी नाहीत.

(२) हे खरे नाही.

खुरशितजी बेहरामजी भाभा रुग्णालयामध्ये रक्त संक्रमण अधिकारी यांच्या ४ पदांपैकी ३ पदे व रक्तपेढी तंत्रज्ञ यांच्या ४ पदांपैकी २ पदे रिक्त असल्यामुळे रक्तपेढी विभाग एका सत्रामध्ये सुरू ठेवण्यात आला आहे.

(३) अन्न व औषध प्रशासन यांची मान्यताप्राप्त ६ तंत्रज्ञ खुरशितजी बेहरामजी भाभा रुग्णालयात कार्यरत असून त्यातील केवळ २ तंत्रज्ञ रक्तपेढीमध्ये कार्यरत आहेत. त्यांची महानगरपालिकेमार्फत रक्तपेढी तंत्रज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

उर्वरीत ४ तंत्रज्ञ यांची महानगरपालिकेमार्फत प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. अन्न व औषध प्रशासन यांची मान्यताप्राप्त तंत्रज्ञ यांची रक्तपेढीतील सेवा आपातकालीन परिस्थितीमध्ये घेण्यात येते.

रुग्णालयामार्फत रुग्णांची रक्ताबाबतची गैरसोय टाळण्याकरीता के. बी. भाभा रुग्णालयाच्या जवळपास असणाऱ्या रक्तपेढ्यांशी करार केलेला असून रुग्णांची सवलतीच्या दरात रक्ताची उपलब्धता केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील पात्र झोपडपट्टीधारकांना थकीत भाडे अदा करण्याबाबत

**(७)** * **३१६८ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपटपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये राज्यातील अनेक विकासकांनी विविध एस.आर.ए. योजनेतील पात्र झोपडीधारकांचे भाड्याचे ६०० कोटीहून अधिक रुपयांचे भाडे थकविले असल्याने वेळेवर भाडे न देणाऱ्या विकासकांची संपत्ती जप्त करण्याचा व गरज भासल्यास थकीत भाडे वसुलीसाठी या संपत्तीचा लिलाव करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय शासनाने घेतल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घर खरेदीमध्ये ग्राहकांची फसवणूक व रेरा कायद्याचे उल्लंघन झाल्याचे सिध्द झाल्यानंतर संबंधित तक्रारदाराने मालमत्तेसाठी विकासकाकडे भरलेली रक्कम व्याजासकट परत करण्याचे आदेश महारेराकडून देण्यात येतात त्यानुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून विकासकाची मालमत्ता जप्त करून त्याचा लिलाव करून त्यातून येणारी निश्चित रक्कम संबंधित तक्रारदारास अदा करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत महारेराकडून एकूण रुपये ९१२ कोटी ११ लाख एवढ्या रकमेच्या वसूलीचे आदेश देण्यात आलेले असून त्यापैकी केवळ रुपये २२२ कोटी १३ लाख एवढ्या रकमेची वसूली करून ग्राहकांना परताव्याची रक्कम अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू ६८९ कोटी ९८ लाख रूपयांची थकीत वसूली किती व कोणकोणत्या विकासकांकडून करावयाची आहे व सदरहू थकीत वसूली करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे व संबंधित ग्राहकांना त्यांच्या थकीत रक्कमा किती कालावधीत अदा करण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांचे विकासकाकडील प्रलंबित भाडे ही जमीन महसूल वसुलीच्या कायद्याप्रमाणे वसूल केल्यास, त्यामुळे थकबाकी वसूल करण्यासाठी योग्य कायदेशीर चौकट उपलब्ध होईल, जेणेकरुन थकीत भाडे व इतर काही देणे असल्यास ते विकासकाकडून वसूल करता येईल. त्यानुषंगाने महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम-१९७१ या कायद्यात ३३-बी नव्याने तरतूद समाविष्ट करुन कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यासंदर्भात मा.मंत्रीमंडळाने दिनांक ०८ एप्रिल, २०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.
(२) हे, खरे आहे.

महारेरा प्राधिकरणाकडे झालेल्या सुनावणी/निर्णयानंतर महाराष्ट्र स्थावर संपदा अधिनियमन, २०१६ मधील कलम ४० (१) व (२) अन्वये फसवणुक झालेल्या तक्रारदाराला पैसे मिळावेत म्हणुन कसुरदाराच्या विरुध्द आवश्यक रकमेचे वॉरंटस् काढुन संबंधित जिल्ह्याकडे पाठविण्यात येते, संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार महसूल वसुली प्रमाणपत्र (Revenue Recovery Certificate) RRC संबंधित जिल्हाधिकारी/तहसिलदार यांच्याकडे पाठवली जाते, आणि पुढील वसुलीची कार्यवाही त्यांच्या स्तरावरून होत असते

(३) होय, हे खरे आहे.

सद्य:स्थितीमधे महारेरा कार्यालयाकडुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे एकूण रुपये ९१६ कोटी ८८ लाख एवढ्या रकमेचे वसुली आदेश पाठवण्यात आले आहेत. त्यापैकी रुपये २३२ कोटी ३० लाख एवढ्या रकमेची वसुली करुन ग्राहकांना परताव्याची रक्कम अदा करण्यात आली आहे.

(४) होय, हे अंशत: खरे आहे.

वसुल करावयाची असलेली रक्कम ६८४.५८ कोटी आहे. ती ३११ इतक्या विकासकांकडे आहे. थकीत वसुली बाबत जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यात खरीप हंगामात धानाची विक्री केलेल्या शेतकऱ्यांचे चुकारे अद्याप प्रलंबित असल्याबाबत

**(८) * २९५९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळांतर्गत आदिवासी विकास कार्यकारी सहकारी संस्थेमार्फत गडचिरोली जिल्ह्यात खरीप व रब्बी हंगामात ८० केंद्रावरून धानाची विक्री केली आहे, मात्र हंगाम संपला तरी २०० शेतकऱ्यांचे जवळपास दीड कोटी रुपयांचे (चुकारे) देयके अद्याप प्रलंबित असल्याने व शेतकऱ्यांचे धान्याचे चुकारे अद्याप त्यांच्या खात्यात जमा न झाल्याने धान उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे दीड कोटीचे धान चुकारे प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांच्या घरचे लग्न कार्यक्रम, घर बांधणे, मजुरांची देणे, सावकारांचे कर्ज, बँकेचे कर्ज थकीत झाले असून शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या धानाचे प्रलंबित असलेले दीड कोटी रुपयांचे (चुकारे) देयक देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशत: खरे आहे.

खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये माहे मार्च अखेर ४४,५८४ शेतकऱ्यांकडून रक्कम रुपये ३११.३० कोटी किमतीच्या धानाची खरेदी करण्यात आली आहे. त्यापैकी ४४५४१ शेतकऱ्यांचे रुपये ३११.०९ कोटींचे चुकारे अदा करण्यात आले आहे. उर्वरीत ४३ शेतकऱ्यांचे २१ लक्ष रुपयांचे चुकारे अदा करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(२) हे खरे नाही.

(३) ४३ शेतकऱ्यांचे २१ लक्ष रुपयांचे चुकारे अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंबईत बेस्ट बसेसची संख्या वाढविण्याबाबत

**(९) * ३२९६ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट उपक्रमाने आयुर्मान संपुष्टात आलेल्या २१६० बसेस मागील पाच वर्षात भंगारात काढल्या असून केवळ ३७ नव्या गाड्यांची खरेदी केली असून मुंबईतील प्रवाशांना ३,३३७ बेस्ट बसेसची आवश्यकता असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्टच्या स्वमालकीच्या बसगाड्यांचा ताफा दिवसेंदिवस घटत असून भाडेतत्वावरील बसची संख्या वाढत असून गैरव्यवस्थापनामुळे मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कणा असलेली बेस्ट बसची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी झाल्यामुळे नागरिकांना गर्दी व बसच्या दीर्घकाळ प्रतिक्षेचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपुऱ्या बेस्ट सेवेमुळे नागरिकांना वाहतुकीच्या दृष्टीने उद्भवणाऱ्या समस्या कमी करण्याकरीता बेस्ट बसच्या ताफ्यात अधिकच्या बसेस समाविष्ट करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने आढावा घेऊन बेस्टच्या सेवेमध्ये अधिकच्या गाड्या खरेदी करुन नागरिकांना सोयी - सुविधायुक्त बेस्ट सेवा पुरविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत बेस्ट उपक्रमाच्या बसताफ्यातील बहुतांश बसगाड्या आयुर्मान संपल्यामुळे निष्कासित होत आहेत. यामुळे होणारी प्रवाशांची गैरसोय टाळण्याकरीता बेस्ट उपक्रमाने भाडेतत्वावर बसगाड्यांचा समावेश करण्यास सुरूवात केलेली आहे. परंतु, बसपुरवठादार कंपन्यांकडून प्राप्त होणाऱ्या बसगाड्यांची संख्या अपुरी असल्याने प्रवाशांच्या संख्येला अनुसरून बसगाड्या प्रवर्तित करण्यास मर्यादा येत आहेत.

(३) बेस्ट उपक्रमामध्ये भाडेतत्वावर ६५५५ बसेस घेण्यासाठी विविध पुरवठादारासोबत करार करण्यात आला आहे. त्यापैकी २१६७ बसेस उपक्रमाच्या सेवेत दाखल झाल्या आहेत. उर्वरित बसेस उपलब्ध होण्यासाठी पुरवठादाराकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

४ ते ५ वर्षात बेस्टचा ताफा किमान १० हजार इतका वाढविण्यावर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय पुढील काही वर्षात बसेसची संख्या १० हजार पर्यंत वाढवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर रुपये २० हजार बोनस देण्याबाबत

**(१०) * २५६१ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: विदर्भातील नागपूर व गोंदिया जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर रुपये २० हजार बोनस देण्याची घोषणा शासनाने हिवाळी अधिवेशनात करुन त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णय निर्गमित करुन सहा महिन्यांचा कालावधी होवूनही अद्याप राज्यातील शेतकऱ्यांना बोनस न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असून त्यांच्यात असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर रुपये २० हजार बोनस अदा करण्याकरीता निधीची तरतूद करुन खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांना तातडीने सदरील बोनस देण्याबाबत तसेच धानाला प्रति हेक्टरी रुपये २० हजार बोनस देण्यास विलंब करणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील नोंदणीकृत पात्र धान उत्पादक लाभार्थी शेतकऱ्यांना बोनस वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या धानाची थकबाकी अदा करण्याबाबत

**(११) * ३४४४ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४ मध्ये मोठ्या प्रमाणावर धानाची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी आधारभूत धान खरेदी केंद्रांवर हमीभावाने (२३०० रुपये प्रति क्विंटल) धानाची विक्री केली असून, दिनांक १५ फेब्रुवारी ते ३१ मार्च, २०२५ पर्यंतच्या १ हजार ३६ शेतकऱ्यांचे रुपये १० कोटी २० लक्ष ७६५० थकीत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान खरेदी केंद्रांवर धानाची थकबाकी वेळेत न मिळाल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांच्या धानाची थकबाकी वेळेत न देण्याची कारणे काय आहेत तसेच सदरहू धानाची थकबाकी शेतकऱ्यांना विहित मुदतीत देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १५ फेब्रुवारी ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीत भंडारा जिल्ह्यात ७४६ शेतकऱ्यांकडून ४०,७१२ क्विंटल धान खरेदी करण्यात आला आहे. सदर धानाची एकूण रक्कम रुपये ९.२३/- कोटी जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांचेकडून दिनांक १२ जुन, २०२५ रोजी संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना वर्ग करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) धान खरेदी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांचेकडून दिनांक १२ जुन, २०२५ रोजी चुकारे अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भत नाही.

-----------------

## अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना व्याज परतावा मिळणेबाबत

**(१२) * २५२९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठा समाजातील तरुणांना उद्योजक बनविण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून दिला जाणारा व्याज परतावा सहा-सात महिन्यांपासून थकीत असल्याने लाभार्थ्यांना घेतलेल्या कर्जावरील व्याज भरण्यासाठी खाजगी सावकारांकडून आर्थिक मदत घेण्याची वेळ आली असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळाचे महास्वयंम हे पोर्टल अद्ययावत (अपडेट) केले नसून ते गत १५ दिवसांपासून बंद असल्याने महामंडळाची प्राथमिक मंजूरी पत्र मिळणे अडचणीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत माहिती घेवून या महामंडळाच्या लाभार्थ्यांचा व्याज परतावा तातडीने देणे व महामंडळाचे पोर्टल अद्ययावत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत सप्टेंबर,२०२४ ते मार्च, २०२५ या कालावधीत ६६,३९५ लाभार्थ्यांच्या २,४५,४३६ व्याजपरताव्यांच्या दाव्यांमध्ये (Claims) एकून रुपये २०७.५९ कोटी इतक्या रकमेच्या व्याज परताव्याचा लाभ देण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

महामंडळाचे पोर्टल udyog.mahaswayam.gov.in या वेब प्रणालीसंबंधी मार्च, २०२५ च्या दरम्यान NICSI या कंपनीमार्फत सपोर्ट व मेंन्टनेंसचे काम सुरु होते. त्यामुळे पोर्टल धिम्या गतीने सुरु होते, मात्र बंद झाले नव्हते.

या कालावधीत देखील ज्यांचे दस्तावेज पूर्ण व पात्र होते अशा प्रकरणांना प्राथमिक मंजुरी पत्र निर्गमित करण्यात आली आहे.

(३) महामंडळाने NICSI या कंपनीमार्फत वेबप्रणाली अद्ययावत करण्याची कार्यवाही पूर्ण केली असून वेबप्रणाली (Portal) सुस्थितीत सुरु आहे. महामंडळामार्फत एप्रिल,२०२५ पासून आतापर्यंत ५५३८ लाभार्थ्यांच्या एकूण ८३९६० दाव्यांच्या प्रकरणी रुपये ७१.९७ कोटीचा परतावा देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील एलफिस्टन पुलाच्या बांधकामाबाबत

**(१३) * २७९० श्रीमती चित्रा वाघ, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एल्फिन्स्टन पुलाच्या बांधकामात जवळपास १९ इमारती पाडून साधारण ४०० हून अधिक रहिवाशांना स्थलांतरित करावे लागणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत सन १९१३ साली बांधण्यात आलेला ब्रिटिशकालीन एल्फिन्स्टन पूल पाडून त्या जागी आता नवा पूल बांधण्यात येणार असून, अटल सेतूवरून आणखी नवा पूल बांधून थेट वरळी, दक्षिण मुंबई आणि वांद्रे परिसराला जोडण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व बाधित १९ इमारतींचा पुनर्विकास कोणत्याही विकासकाची वाट न पाहता ३३(९) अंतर्गत एमएमआरडीएने करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या पुलाचे बांधकाम करताना १९ इमारतींमधील साधारण: ४०० हून अधिक रहिवाशांना स्थलांतरित करावे लागणार असल्याने त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रथम सोडवून या पुलाचे पाडकाम आणि बांधकाम सुरू करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, एल्फिन्स्टन पुलासाठी बाधित असलेल्या इमारती व चाळीतील शेकडो रहिवाशांचे पुनर्वसन त्याच परिसरात एमएमआरडीएमार्फत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) होय, हे खरे आहे.

शिवडी-वरळी जोडरस्ता प्रकल्पामध्ये एलफिस्टन ब्रिज अंतर्गत १९ इमारती बाधित होत होत्या. दरम्यानच्या काळामध्ये शिवडी वरळी जोड रस्ता प्रकल्पाच्या आराखड्यात बदल करण्यात आले. त्यानुसार आता १९ इमारतीपैकी २ इमारती बाधित होत आहेत.

सदर २ बाधित इमारतीमधील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्राधिकरणाने आर्थिक ऐच्छिक धोरणांतर्गत रोख रक्कम या स्वरुपात नुकसान भरपाई देणे किंवा प्राधिकरणाकडे उपलब्ध सदनिकांमध्ये पुनर्वसन करणे या उपाययोजना केल्या आहेत. तथापि, सदर इमारतीमधील प्रकल्पग्रस्तांनी प्राधिकरणाने सूचविलेल्या आर्थिक व पर्यायी पुनर्वसनाला विरोध दर्शविलेला आहे. प्रकल्पग्रस्तांनी बाधित ठिकाणी (In-Situ) पुनर्वसन करण्यात यावे, बाधित ठिकाणाच्या १ कि.मी. परिघक्षेत्रात पुनर्वसन करण्यात यावे, म्हाडाच्या ३३ (७) योजनेंतर्गत जे फायदे सदनिका धारकांना मिळतात त्यानुसार घराच्या वाढीव चटई क्षेत्राचे बाजार भावाच्या मुल्यांकनानुसार मोबदला देण्यात यावा अशा स्वरुपाच्या मागण्या प्राधिकरणाकडे केलेल्या आहेत. सदर मागण्या विचारात घेऊन सदर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत प्राधिकरणाकडून प्रकल्पाग्रस्तांची चर्चा करुन अन्य पर्यायाचा विचार करण्याबाबत प्राधिकरणाच्या स्तरावर वाटाघाटी सुरु आहेत.

-----------------

## मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर उड्डाणपुल बांधण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत

**(१४)** * **२३८६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुना मुंबई-पुणे महामार्गावरील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर राज्य मार्ग विकास महामंडळाने १६ ठिकाणी सुमारे २०० ते ५०० मीटर लांबीचे उड्डाणपुल बांधण्याचा आराखडा तयार केला असून, प्रस्ताव सादर होऊन ७ वर्षे उलटूनही प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विलंबामुळे सोमाटणे फाटा, लिंब फाटा, काशीद-वाकण रस्ता, एमआयडीसी वडगाव, देहूरोड बाय जंक्शन, वडगाव फाटा, निगडी फाटा व किवळे फाटा आदी ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे अपघातांचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित १६ उड्डाणपुलांच्या कामांची एकूण अंदाजित किंमत रुपये २०८ कोटी एवढी असून त्यात दीर्घकालीन विलंब झाल्यास खर्चात वाढ होऊन प्रकल्पाच्या तांत्रिकदृष्ट्या अंमलबजावणीस समस्या उद्भवणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाकडून प्रस्तावास अद्याप मंजुरी न मिळण्याची कारणे काय आहेत व या प्रस्तावांना मंजुरी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ हा केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ सवलतदार म्हणून काम पाहत आहेत. सदर महामार्गावरील ९ उड्डाणपूल बांधण्याबाबतचा प्रस्ताव रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

(२) प्रस्तावित उड्डाणपूलांच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार वाहतूक सुरक्षिततेच्यादृष्टीने, वाहतूक सुरळीत होण्यासाठी व अपघात टाळण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपाच्या सर्व उपाययोजना (उदा.रम्बलर स्ट्रिप्स,

ब्लिंकर्स, वाहतूक साईनबोर्ड्स इ.) लावण्यात आलेले आहेत.

(३) सदर प्रस्तावित किंमत सन २०२१-२२ च्या दरसूचीवर आधारीत असून प्रत्यक्ष मंजुरीच्या अनुषंगाने भाववाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(४) या प्रस्तावांबाबत मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांनी संबंधीतांसमवेत बैठका घेऊन दिनांक ०५/०३/२०२५ च्या पत्रान्वये मुंबई-पुणे या राष्ट्रीय मार्गाचे सहापदरीकरण करणे व उड्डाणपूलांची कामे तातडीने हाती घेण्याच्या दृष्टीने आवश्यक मंजूरी देण्याबाबत केंद्र शासनास विनंती केलेली आहे व याबाबत केंद्र शासनाकडे सतत पाठपुरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोअर परळ येथील बॉम्बे डाईंग मिलच्या भूखंडावरील अनधिकृत बांधकामाची चौकशी करण्याबाबत

**(१५) * २३८३ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांडुरंग बुधकर मार्ग, (लोअर परळ) मुंबई येथील भूखंड क्र. ४/७९९, ८०७, ८०९ स्थित बॉम्बे डाईंग मिलमध्ये सद्य:स्थितीत सुरु असलेल्या बांधकामादरम्यान २०० पेक्षा अधिक वृक्षांची विनापरवानगी कत्तल केल्याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मा.नगरविकास मंत्री महोदयांकडे दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही या ठिकाणी बांधकामासाठी आवश्यक असलेल्या पर्यावरण विभाग तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका, अग्निशमन दलाच्या विविध प्रकारच्या परवानग्या न घेताच राजरोसपणे वेळेच्या बंधनाचे पालन न करता अहोरात्र बांधकाम सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू ठिकाणी विनापरवानगी वृक्षांची कत्तल करून अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधितांविरुध्द तसेच अनधिकृत बांधकामास अभय देणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परळ, मुंबई येथील भूखंड क्र. ४/७९९, ८०७, ८०९ येथे सद्य:स्थितीत कोणत्याही नविन बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात आलेली नाही.

भूखंड क्र. ४/७९९, ८०७ व ८०९, पांडुरंग बुधकर मार्ग, मुंबई येथे अस्तित्वात असलेल्या IT इमारत क्र. ०२, या इमारतीमध्ये अंतरिक फेरबदल (addition / alteration) करीता तात्पुरती अग्नि सुरक्षा मान्यता (Provisional Fire Safety Approval) देण्यात आलेली आहे. परंतु त्याबाबतचे पूर्तता प्रमाणपत्र (Fire Compliance) अग्निशमन दलाकडून देण्यात आलेले नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या स्थळ पाहणीमध्ये सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारची वृक्षतोड झाल्याचे तसेच अनधिकृत बांधकाम केल्याचे आढळून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांजूरमार्ग (मुंबई) येथील डम्पिंग ग्राउंड बंद करण्याबाबत

**(१६) * ३३८३ श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मोठ्या प्रमाणातील कचरा हा कांजूरमार्ग कचराभूमीवर नेऊन टाकला जात असून त्याच्या दुर्गंधीच्या तीव्र त्रासामुळे तेथील नागरिकांना श्वसनाचे आजार तसेच इतर अन्य आजारांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिकांच्या तक्रारीनुसार या कचराभूमीवर संपूर्ण मुंबईचा कचरा उघड्यावरच टाकला जातो आणि या कचऱ्यावर दुर्गंधीनाशक फवारणी होत नाही तसेच कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणतीही शास्त्रशुध्द पध्दत वापरली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाकडून मुंबईतील कचऱ्याची विल्हेवाट करण्याच्या दृष्टीने कोणती प्रक्रिया केली जाते, याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन प्रतिवर्षी किती रुपये निधी खर्च करते, बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन अत्याधुनिक तंत्रज्ञान मशिन्सचा वापर करणार आहे काय,

(४) असल्यास, या कचराभूमीमुळे व दुर्गंधीमुळे आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात वारंवार गंभीर आजाराच्या समस्या उद्‌भवत असून या डम्पिंग ग्राउंड मुळे होणाऱ्या त्रासाला कंटाळून स्थानिक नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला असून मुलुंड ग्राउंड प्रमाणेच कांजूरमार्ग डम्पिंग ग्राउंड बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) खरे नाही.

कांजूर येथे स्विकारण्यात येणारा कचरा उघड्यावर टाकला जात नसून त्यावर बायोरिॲक्टर तंत्रज्ञान व खत निर्मिती तंत्रज्ञान वापरून शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जाते. तसेच, कचऱ्यावर दुर्गंधीनाशक द्रव्यांची फवारणी केली जाते.

दरवर्षी स्वीकारण्यात येणाऱ्या कचऱ्याच्या परिमाणानुसार सदर खर्च साधारणपणे रुपये १८०-१९० कोटी एवढा येतो. सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनातर्फे कांजूर येथे वेस्ट टू एनर्जी व बायोगॅसचे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रकल्प राबविण्याबाबत तपासणी करण्यात येत आहे. मुंबईत निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी सुमारे ९०% कचऱ्यावर कांजुर येथे शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जाते.

(४) मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. २०/२०१३ मध्ये दिनांक ०२/०५/२०२५ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये कांजुर प्रकल्पाची जागा ही संरक्षित वनक्षेत्र ठरविण्यात आलेली आहे. सदर आदेशाविरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याबाबत महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

मुंबईत निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी सुमारे ९०% कचऱ्यावर कांजुर येथे शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील सुस्थितीतील इमारती अतिधोकादायक ठरविल्याबाबत

**(१७) * ३४९८ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील मोक्याच्या जागांवरील सुस्थितीतील काही इमारती ह्या तेथील स्ट्रक्चरल ऑडिटर व ठाणे महानगरपालिकेतील काही अधिकारी यांनी संगनमत करुन विकासकांचा फायदा व्हावा या उद्देशाने अतिधोकादायक ठरविल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या नियमानुसार अतिधोकादायक, धोकादायक, दुरुस्तीयोग्य अशाप्रकारे वर्गवारी करण्यात आली असून काही विशिष्ट स्ट्रक्चरल ऑडिटर फर्म व महानगरपालिका अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन बेकायदेशीरपणे इमारती धोकादायक ठरविल्यामुळे जनतेमध्ये असंतोषाची भावना व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन गत पाच वर्षात अतिधोकादायक घोषित केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिट अहवालांची पुन्हा एकदा त्रयस्थ संस्थेमार्फत छाननी करुन यास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) खरे नाही.

ठाणे महानगरपालिकेने दिनांक ०७/०८/२०१५ च्या आदेशान्वये जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीं संदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती व मार्गदर्शक सूचना (SOP) तयार केली आहे. तसेच,महानगरपालिका क्षेत्रातील ३० वर्षे आयुर्मान झालेल्या व जुन्या/ मोडकळीस आलेल्या इमारतीची दरवर्षी पावसाळयापूर्वी तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत पाहणी/सर्व्हेक्षण करण्यात येते. सदर सर्व्हेक्षणात सकृतदर्शनी धोकादायक आढळून आलेल्या इमारतींची शासन परिपत्रक दिनांक ०५/११/२०१५ नुसार धोकादायक इमारतीची सी-१ (अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गात मोडणाऱ्या),सी-२ए (इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गात मोडणाऱ्या),सी-२बी (इमारत रिकामी न करता संरचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गात मोडणाऱ्या),सी-३ (इमारतीची किरकोळ दुरुस्ती प्रवर्गात मोडणाऱ्या) अशी प्रवर्ग निहाय विगतवारी करण्यात येते.

धोकादायक इमारतींचे मालक /भोगवटादार यांना सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांचेकडून नोटीस बजावून इमारतीचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करुन लेखा परिक्षण अहवाल (स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट) सादर करणेबाबत कळविण्यात येते. याकरीता ठाणे महानगरपालिकेकडून दरवर्षी विहित निविदा प्रक्रिया राबवून त्यासाठी स्ट्रक्चरल इंजिनिअर यांची महानगरपालिकेच्या तालिकेवर (पॅनल) नेमणूक करण्यात येते.

(३) आवश्यकतेनुसार संरचनात्मक लेखापरीक्षण अहवालाची (स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट) त्रयस्थ संस्थेमार्फत (VJTI/IIT) तपासणी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील शाळांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(१८)** * **२३३६ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना बालवयात कुठलेही व्यसन लागू नये म्हणून शाळा परिसरात ५०० मीटरच्या आत तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास निर्बंध असताना पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील अनेक शाळांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैधरित्या होत असलेल्या विक्रीविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.

(२) अन्न व औषध प्रशासनाच्या रायगड कार्यालयामार्फत सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) कायदा, २००३ अंतर्गत माहे एप्रिल, २०२५ ते माहे मे, २०२५ या कालावधीत एकूण ३ व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच, सन २०२४-२५ या कालावधीत एकूण १० व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहराच्या विकासाकरीता “वहन क्षमता सर्वेक्षण” करण्याबाबत

**(१९)** * **३६२६ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्षमतेपक्षा अधिक विकास केल्याने पर्यावरण व पायाभूत सुविधांचा ऱ्हास होत असून शहरी विकास आणि पर्यावरणीय शाश्वतता यांच्यामध्ये समतोल राखण्यासाठी मुंबई शहराकरीता “वहन क्षमता सर्वेक्षण” करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने राज्य शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांना नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरीकरणामुळे (Urbanization) शहरांचा विकास वेगाने होत आहे, परंतु जास्त विकासामुळे पर्यावरणावर आणि पायाभूत सुविधांवर नकारात्मक परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने “वहन क्षमता सर्वेक्षण” करण्याकरीता बजावलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

द कंन्झरवेशन ॲक्शन ट्रस्ट आणि इतर (The Conservation Action Trust & Anr.) यांनी मा.उच्च न्यायालय, बॉम्बे येथे जनहीत याचिका क्र. २३/२०२५ अन्वये दाखल केलेली आहे. मा.उच्च न्यायालयाने मुंबई शहराकरीता वहनक्षमता सर्वेक्षण (Carrying Capacity) करुन मुंबई शहराचे विकास धोरण निश्चित करण्याकरीता दिनांक ०९/०४/२०२५ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व इतर प्रतिवादी यांना निर्देशित केले आहेत.

(२) व (३) मूळ अर्ज क्र.६८१/२०१८ बाबत राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशास अनुसरून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (आयआयटी, मुंबई) यांना दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी महाराष्ट्रातील मुंबई शहरासहीत १७ दुर्लक्षित शहरांच्या वहनक्षमता सर्वेक्षण करीता कार्यादेश दिले आहेत. सद्य:स्थितीत सदर अहवाल अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यात तांदूळ खरेदी, साठवणूक आणि प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) * ३६७१ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात तांदूळ खरेदी साठवणूक आणि प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झालेल्या तीन प्रकरणात रुपये २ कोटी वसूल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी माहे मार्च-एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यामध्ये काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे आहे.

गडचिरोली जिल्ह्यात धान खरेदी व भरडाई प्रक्रियेमध्ये अनियमिततेबाबत शासनाकडे प्राप्त तक्रारींनुसार राज्य शासनाकडुन चौकशी समिती नेमुन चौकशी करण्यात आली. सदर समितीच्या अहवालानुसार दोषींवर कारवाई करुन संबंधितांकडून १.३७ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. वसुलीची रक्कम जमा न केलेल्या संबंधितांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडुन आदेशित करण्यात आले आहे.

(३) संबंधित तत्कालिन प्रादेशिक व्यवस्थापक यांना निलंबित करुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिर विकास आराखड्याबाबत

**(२१) * ३८६१ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिर विकास आराखड्यात फक्त बाह्य सुधारणांना महत्त्व दिले गेले असून सदर मंदिराचे मूळ दगडी बांधकाम, त्यावरील शिल्पांची दुरवस्था, मंदिराची गळती, सुटलेल्या शिळा, दगडांची अडत यापैकी कोणत्याही बाबींचे जतन व संवर्धन करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मूळ मंदिराच्या जतन संवर्धनाला प्राधान्य देऊन त्याचा समावेश आराखड्यात करून शिखर समितीकडे सदर आराखडा सादर करा अशा सूचना पालकमंत्री, कोल्हापूर जिल्हा यांनी केल्या असल्याची माहिती माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सूचनेनुसार सदर आराखड्यात सुधारणा करून आराखडा सादर करण्यात आला आहे काय, तसेच अंबाबाई मंदिर विकास आराखड्यात वर नमूद बाबींचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) दिनांक ३०/०४/२०२५ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात मंदिराची गळती, सुटलेल्या शिळा, दगडांची अडत इ.बाबी मूळ प्रस्तावात अंतर्भूत करणेत आलेल्या होत्या. तसेच सदर बैठकीमध्ये मा.सह-पालकमंत्री, कोल्हापूर जिल्हा यांनी दिलेल्या निर्देशानुसार कामांचा समावेश करुन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सुधारित आराखडा तयार करुन शासनास सादर केला. दिनांक ०६/०५/२०२५ रोजी चौंडी, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये आराखड्यास तत्वत: मंजुरी देण्यात आली आहे व त्यानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बोरिवली (मुंबई) येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालयात नवजात अतिदक्षता कक्ष उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२२) * ३८७६ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरिवली (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालयाची स्थापना होऊन तीन वर्षाचा कालावधी होऊनही अद्याप रूग्णालयात आयसीयू, नवजात अतिदक्षता कक्ष (एनआयसीयु) उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना किंवा गर्भवती महिलांना शताब्दी रुग्णालय, कांदिवली, (मुंबई) येथे किंवा इतर महानगरपालिका रुग्णालयामध्ये उपचारासाठी स्थलांतरित करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महानगरपालिका रुग्णालय, बोरिवली (पू), मुंबई या रुग्णालयात तातडीने आयसीयू, नवजात अतिदक्षता कक्ष (एनआयसीयु) उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सर्वसाधारण रुग्णालयात बाह्यरुग्ण व आंतररूग्ण सेवा पुरवल्या जातात. केवळ अत्यंत जटील व तातडीच्या अत्यावश्यक शस्त्रक्रियेसाठीच रुग्णास भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयामध्ये स्थानांतरीत करण्यात येते.
(३) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सर्वसाधारण रुग्णालयात अतिदक्षता विभाग सुरू करण्यात येत असून याबाबतची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच, नवजात शिशु अतिदक्षता विभाग सुरू करण्याकरीताची आवश्यक कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील रस्त्याची व पुलाची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

**(२३) * ४००१ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा कारंजा, जलालखेडा, आष्टी-धार-पारडी-नारा,आजनगाव-पिंपळगाव-आंजी (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील रस्त्यांची व पुलाची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्यामुळे या कामांची चौकशी करून कारवाई करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम व सार्वजनिक बांधकाम (सा. उ.) यांना दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची कामे ही निकृष्ट दर्जाची होत असताना त्या कामाची पाहणी व तपासणी न करता शाखा अभियंता व कार्यकारी अभियंता यांचेकडून एम.बी रेकॉर्ड करून कंत्राटदाराची देयके काढण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी करून शासकीय निधीचा अपव्यय टाळण्याकरीता दोषी कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, निवेदन प्राप्त आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सा.बां.प्रा. विभाग नागपूर यांचेकडून अहवाल मागवण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेतील विविध संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये सुधारणा करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(२४) * ४२४१ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेतील विविध संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये ५५ वर्षांनंतर सुधारणा करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सन २०१९ पासून सुरू असून ६ वर्षांपेक्षा अधिक काळ उलटूनही सदर कार्यवाही पूर्ण झालेली नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,(२) असल्यास, प्रस्तावित सुधारित सेवाप्रवेश नियमांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व विधी व न्याय विभाग ह्यांची मंजुरी मिळाली आहे काय,

(३) असल्यास, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत अपर मुख्य सचिव ह्यांनी सुधारित प्रवेश नियम दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत प्रसिध्द करणेबाबत आदेश केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आदेशाची मुदत संपून एक वर्ष उलटले तरीही नियम अद्याप प्रसिध्द झाले नसून, सदर नियम प्रसिध्द करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१), (२), (३), (४) व (५) होय, हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियांत्रिकी सेवेतील विविध संवर्गातील पदे जलसंपदा विभागाच्या दिनांक १९/१२/१९७० च्या अभियांत्रिकी संवर्गातील विविध संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांच्या आधारे भरण्याची कार्यवाही करण्यात येते. सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियांत्रिकी सेवेमध्ये कालानुरूप होणारे बदल लक्षात घेऊन प्रशासकीय सुसूत्रता येण्याच्या दृष्टीकोनातून या विभागाकडून स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-ब) (अराजपत्रित), सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) (गट-ब) (राजपत्रित), उप अभियंता (स्थापत्य) (गट-अ) (राजपत्रित) व कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ) (राजपत्रित) या संवर्गांचे स्वतंत्र सेवाप्रवेश नियम तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

अभियांत्रिकी संवर्गातील विविध संवर्गाचे स्वतंत्र सेवाप्रवेश नियम तयार करतांना अनेक तांत्रिक आणि प्रशासकीय बारकावे आहेत. सदर प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असून त्यात अनेक प्रशासकीय, कायदेशीर आणि सेवा ज्येष्ठतेचे मुद्दे समाविष्ट आहेत. या संदर्भात अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ ऑक्टोंबर, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत संघटनेच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत शासन विभागस्तरावर समिती स्थापन करून त्या समितीचा अहवाल मा.मंत्री महोदयांना सादर करेल, असे अपर मुख्य सचिव यांनी बैठकी दरम्यान सुचित केले. त्यास अनुसरून विभागस्तरावर सह सचिव (सेवा) व सह सचिव (आस्था) यांची समिती स्थापन करण्यात आली. समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, २०२१ मधील तरतूदींचा आधार घेऊन "सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) (गट-ब) (राजपत्रित) व उप

अभियंता (स्थापत्य) (गट-अ) (राजपत्रित)" या पदाचे ज्येष्ठता नियमांचे प्रारुपास मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

जलसंपदा विभागाचे सन १९७० चे सेवाप्रवेश नियम व सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्वतंत्र प्रस्तावित सेवाप्रवेश नियम तयार करतांना कालानुरूप होणारे बदल विविध संवर्गांच्या नेमणुका, पदोन्नती यांचा विचार करून प्रशासकीय पेच निर्माण होणार नाही याची खात्री करण्यासाठी प्रस्तावित सेवाप्रवेश नियमांची सखोल तपासणी करण्यात येत आहे.

-----------------

## धुळे शहरातील वरखेडी रोडवरील कचरा डेपो स्थलांतरित करणेबाबत

**(२५) * ४४४८ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महानगरपालिकेंतर्गत जुन्या धुळयाला लागून वरखेडी रोडवर शहराच्या मध्यभागी रहिवाशी वस्तीतील कचरा डेपो इतरत्र स्थलांतरित करण्यासंदर्भात ठराव होऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कचरा डेपो हा रहिवाशी भागातून इतरत्र स्थलांतरित करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून वेळोवेळी धुळे महानगरपालिकेस निवेदने देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरखेडी कचरा डेपोतील प्रचंड कचरा व दुर्गंधीला वरखेडीसह जुन्या धुळयातील नागरिकांना सतत सामोरे जावे लागत असून, शहरातून कचरा संकलित करणारा ठेकेदार उक्त कचरा हा वरखेडी रोड परिसरातील कचरा डेपो मध्येटाकला जात असून या संकलित कचऱ्याला आग लावून तो नष्ट करण्यात येत असल्यामुळे याचा त्रास स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दुर्गंधीयुक्त कचऱ्याला आग लावल्यामुळे निर्माण होणारा धूर हा घातक असून, त्यामुळे नागरिकांना श्वसनाचा त्रास होऊन आरोग्याच्या तक्रारी वाढल्यामुळे याबाबत तक्रारी करूनही योग्य दखल घेतली जात नसल्याची तक्रार स्थानिक नागरिकांची असून, सदर कचरा डेपो अन्य ठिकाणी स्थलांतरित करण्यात यावा, नागरिक क्षेत्रापासून त्याला लांब नेण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी धुळे शहरातील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने शहरातील मध्यभागी असलेला कचरा डेपो शहरा बाहेर तातडीने स्थलांतरित करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही, हे खरे नाही.

सध्या अस्तित्वातील घनकचरा व्यवस्थापनासाठी वरखेडी रोडवरील जागा हि शहराच्या पूर्वेस नागरी वस्तीपासून (जुने धुळे) साधारणतः ५०० मी. लांब राष्ट्रीय महामार्ग ३ च्या बाजूला अस्तित्वात आहे. दुसऱ्या जागे संदर्भात दिनांक १९/०९/२००१ च्या ठराव नं. १००४ नुसार धुळे नगरपालिका मार्फत शहराच्या पश्चिमेस नव्याने घनकचरा विल्हेवाटीसाठी सर्व्हे नं. ५१०/अ-२ पैकी जमीन संपादित करणेचा

ठराव मंजूर केला आहे. परंतु यात अस्तित्वातील कचरा डेपो स्थलांतरित करणे संदर्भात कोणताही उल्लेख नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

जुन्या कचऱ्याला आग ही उन्हाळयात तापमान वाढ झाल्यामुळे लागते कोणामार्फत हेतुपरस्पर लावली जात नाही.

(४) होय, हे खरे आहे.

कचरा डेपो सर्व्हे नं.६१ व ६२ येथे बायोमायनिंग व्दारे मोकळया झालेल्या जागेत प्रस्तावित सोलार पार्क व बांबू व इतर झाडांची लागवड करण्यात येणार असल्याने शहरातील जनतेच्या आरोग्याला कोणतीही हानी होणार नाही.

(५) धुळे मनपा हदीतील अस्तित्वातील कचरा डेपो सर्व्हे नं.६१ व ६२ येथील जुन्या साठलेल्या कचऱ्यावर स्वच्छ भारत अभियान १.० अंतर्गत बायोमायनिंग द्वारे जुन्या कचऱ्याची विल्हेवाट करून आतापर्यंत पहिल्या टप्प्यात सुमारे ६ एकर जमीन मोकळी करण्यात आली आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत उर्वरित कचऱ्यावर बायोमायनिंग चे काम चालू आहे. तसेच सदरच्या जागेत अमृत २.० अंतर्गत मलनिस्सारण प्रकल्पासाठी व सोलार यंत्रणा बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. सध्याचा कचरा डेपो शहराबाहेर स्थलांतरित करण्याबाबत.

महानगरपालिका स्तरावर सद्य:स्थितीत कोणताही प्रस्ताव नाही तथापी मनपा मालकीच्या सर्व्हे नं.२०७ येथे सुक्या कचऱ्यावर १५० TPD क्षमतेचा Processing Plant कार्यान्वित आहे व सर्वे नं.२०५ येथे ओल्या कचऱ्यावर ३० TPD क्षमतेचा बायोगॅस प्रकल्पाचे काम अंतिम टप्यात आहे. यामुळे वरखेडी रोड येथे अस्तित्वातील कचऱ्याचे व दैनंदिन येणाऱ्या कचऱ्याची पूर्णपणे विल्हेवाट होत असल्याने कचरा Dumping करणे बंद करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रुग्णालयांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२६) * २५७२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय (के.ई.एम.) येथे देशभरातून विविध आजाराचे असंख्य रुग्ण उपचारासाठी येतात परंतु शताब्दी वर्ष साजरे करणाऱ्या सदर रुग्णालयाला आजही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य रुग्णालयांपैकी बाई यमुनाबाई लक्ष्मण नायर धर्मादाय रुग्णालय (नायर) येथील एमआरआय मशीन बंद असून, राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय (के.ई.एम.) मधील एम.आर.आय मशीन जुनी झाल्याने तेथे येणाऱ्या रुग्णांना एमआरआय व सिटीस्कॅन करण्यासाठी एक वर्षभराची प्रतीक्षा करावी लागत असल्यामुळे रुग्णालयातील सर्व समस्या तात्काळ निकाली काढण्यासाठी

शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेची प्रमुख रुग्णालये असलेली केइएम, नायर, सायन, डॉ. रु. न. कूपर या रुग्णालयांमध्ये औषधाचा तुटवडा निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली असून, सदर रुग्णालयात स्वच्छतेचा अभाव, उद्वाहनाच्या समस्यांसह इतर असुविधा असल्याची बाब निदर्शनास आली असून यासंदर्भात शासनाने माहिती व असुविधांचा आढावा घेवून कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय (के.ई.एम.), नायरसह इतर रुग्णालयातील बंद असलेले एमआरआय व सीटी स्कॅन मशीन सुरू करण्याबाबत तसेच सदर रुग्णालयातील सर्व मूलभूत समस्यांचे तात्काळ निराकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशतः खरे आहे.

बाई यमुनाबाई लक्ष्मण नायर धर्मादाय रुग्णालयातील एमआरआय मशिन नोव्हेंबर २०२३ पासून बंद आहे. तथापि, एमआरआयसाठी येणाऱ्या रुग्णांना छोटा सायन येथील बृहन्मुंबई महानगरपालिका मान्यताप्राप्त पी.पी.पी सेंटर मध्ये पाठविण्यात येत आहे. तेथे महानगरपालिकेच्या दराने सेवा उपलब्ध होते.

केईएम रुग्णालयातील क्षकिरण विभागात सध्या १ एमआरआय मशिन व २ सीटी स्कॅन मशीन सुरू आहेत. दोन्हीही रुग्णालयातील अत्यावश्यक रुग्णांचे एमआरआय व सी.टी. स्कॅन त्याच दिवशी करण्यात येते.

रुग्णांची गैरसोय होवू नये याकरीता सी.टी स्कॅन आणि एमआरआय करण्यासाठी रुग्णांना लोकमान्य टिळक महानगरपालिका सामान्य रुग्णालय, गोवंडी शताब्दी रुग्णालयात पाठविले जाते. याव्यतिरिक्त वाडीया रुग्णालयाबरोबर म्यूचल कॉन्ट्रक्ट करून केईएमच्या दरात सी.टी स्कॅन आणि एमआरआयच्या सुविधा पुरविल्या जातात.
(३) महानगरपालिकेच्या रुग्णालयात सर्वसामान्य गरीब जनतेला औषधे ही विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येऊन कोणताही रुग्ण औषधांपासून वंचित राहू नये याची काळजी घेण्यात येते.

बाई यमुनाबाई लक्ष्मण नायर धर्मादाय रुग्णालयाच्या इमारतीचे उदवाहन चालू स्थितीत आहेत.
(४) डॉ. रुपये न. कूपर रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची सीटी स्कॅन व एमआरआय करण्यासाठी मे. रूबी अलकेअर सर्व्हिसेस प्रा. लि. या कंत्राटी या पीपीपी तत्वावर सीटी स्कॅन व एमआरआय केंद्र सुरू करण्यात आले आहे.

तसेच, इतर प्रमुख रुग्णालयांकरीता नविन तीन एमआरआय मशीन खरेदी करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खाते मार्फत चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अखत्यारीतील सार्वजनिक जलतरण तलावांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(२७) * २८६३ श्री.अंबादास दानवे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अखत्यारीतील सार्वजनिक जलतरण तलावांच्या देखभाल दुरुस्तीवर करण्यात आलेल्या कोटयवधी रुपयांच्या खर्चाच्या तपशिलाची माहिती महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडे उपलब्ध नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १३ सार्वजनिक जलतरण तलावांपैकी १० तलाव ठेकेदारांना चालविण्यास देण्यात आले असून, उर्वरित तीनही तलाव ठेकेदारास देण्यात येणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या तलावाच्या देखभाल दुरुस्तीवर महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाच्या वतीने वर्षाकाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात येतो परंतु या खर्चाची एकत्रित आकडेवारीच स्थापत्य विभागाकडे उपलब्ध नसल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेकडून स्थापत्य विषयक कामासाठी वार्षिक रुपये १३० कोटींचा निधी राखीव ठेवण्यात येत असून सार्वजनिक जलतरण तलावासाठी नेमण्यात आलेल्या कर्मचारी यांच्या वेतनावर रुपये २ कोटी व सुरक्षेसाठी रुपये ८० लाख व अन्य खर्चासाठी रुपये १ कोटी २५ लाख वर्षाला खर्च करण्यात येत असून यामध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून शासनाच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरातील जलतरण तलावावर पोहण्यासाठी उन्हाळ्यात गर्दी होते,तलाव संचलन देखभाल व दुरुस्तीचा खर्च महानगरपालिकेला खर्चिक असून महानगरपालिकेने सर्व तलाव ठेकेदारांना चालविण्यास देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रत्येक तलावासाठी एक याप्रमाणे तेरा व्यवस्थापक, ३६ जीवरक्षक तसेच दिवसाला तीन पाळीप्रमाणे सुरक्षा कर्मचारी ह्यांचे वेतन तसेच पाण्याचे ठेकेदारामार्फत शुद्धीकरण इ बाबी पाहता स्थापत्य व यांत्रिक देखभाल, दुरुस्ती, वीज बिल, पाणी शुद्धीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई यासाठी कोट्यवधी रूपयांचा निधी खर्च करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, स्थापत्य विषयक कामासाठी, क्रीडा विभागासाठी वार्षिक १३० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद आहे मात्र जलतरण तलावासाठी किती एकत्रित निधी किती देण्यात येतो याची एकत्रित आकडेवारी उपलब्ध नसून शहरातील तरण तलावासाठी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व सोयी सुविधा या ठेकेदारांमार्फत दिल्या जातात का याची तपासणी महानगरपालिकेकडून करून या कर्मचाऱ्यांना देखील सुरक्षा कवच, आरोग्य विमा आणि इतर सोयी सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने

महानगरपालिकेच्या जलतरण तलावाच्या देखभाल दुरुस्तीच्या निधीमध्ये अनियमितता करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १३ जलतरण तलावांपैकी १२ जलतरण तलाव चालविण्यास देण्याबाबतची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यापैकी ११ तलाव ठेकेदारास हस्तांतरीत करण्यात आले असून १ तलाव हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

या तलावाकरीता करण्यात येणाऱ्या खर्चाची एकत्रित आकडेवारी स्थापत्य विभागाकडे उपलब्ध आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) अंशत: खरे आहे.

तलाव चालू ठेवण्यासाठी सदर बाबीं करणे आवश्यक आहे. जलतरण तलावांच्या सुरक्षितेतसाठी महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागामार्फत केवळ सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

व्यवस्थापक, जीवरक्षक, स्थापत्य व यांत्रिकी विषयक किरकोळ दुरुस्ती, वीज बिल, पाणी शुद्धीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई इ. खर्च संबंधित ठेकेदारांमार्फत करण्यात येतो.

(६) महानगरपालिकेकडून क्रीडा-स्थापत्य विषयक कामांसाठी वार्षिक र.रुपये १३० कोटी तरतूद केलेली नाही. सन २०२४-२५ करीता स्थापत्य क्रीडा विषयक कामासाठी भांडवली, किरकोळ दुरुस्ती व देखभाल कामे मिळून एकूण तरतूद र.रुपये २६ कोटी इतकी होती. सन २०२४-२५ मध्ये त्यापैकी जलतरण तलावाच्या देखभाल दुरुस्तीसाठी सुमारे र.रुपये ५० लाख इतका खर्च झालेला आहे.

सन २०२५-२६, साठी क्रीडा स्थापत्य विषयक कामासाठी भांडवली, किरकोळ दुरुस्ती व देखभाल कामे मिळून एकूण र.रुपये ३३.०९ कोटी इतकी तरतूद आहे.

क्रीडा विभागाचे सन २०२५-२०२६ चे अंदाजपत्रकामध्ये महानगरपालिका पोहण्याचे तलाव पाणी शुद्धीकरण, परिसर स्वच्छता/साफसफाई या लेखाशिर्षावर एकूण र. रुपये २ कोटी इतकी अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु अद्याप पर्यंत सदरची तरतूद खर्च केलेली नाही.

जलतरण तलावासाठी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व सुविधा ठेकेदारांमार्फत देणेत येतात.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शाळा क्र.५४ चे बांधकाम सुरु करण्याबाबत**

**(२८) * २४९१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेंतर्गत मोहीली येथील जुनी शाळा क्र.५४ पाडल्याने

महानगरपालिकेच्या इयत्ता १ ली ते ५ वी चे विद्यार्थी गत दोन महिन्यांपासून खाजगी घरात एकत्रितपणे शिक्षण घेत असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन शाळा बांधण्याचे काम सुरू होत नसल्याने विद्यार्थी/पालक यांना अनेक शैक्षणिक समस्यांना सामोरे जावे लागत असून, सदरहू कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेंतर्गत असलेल्या शाळा क्र.५४ चे बांधकाम तातडीने सुरू करून विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेंतर्गत असलेल्या शाळा क्र.५४ चे बांधकाम सुरू करण्यात आले असून, सद्य:स्थितीत पायाभरणी (फुटींग) चे काम पूर्ण झालेले आहे. सदर इमारतीचे उर्वरित बांधकाम माहे ऑगस्ट, २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करून विद्यार्थ्यांकरीता नवीन शाळेची इमारत उपलब्ध करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

या शाळेच्या आसपास महानगरपालिकेची पर्यायी शाळेची व्यवस्था नसल्याने, विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून खाजगी ठिकाणी विद्यार्थ्यांकरीता तात्पुरती शाळेची व्यवस्था करण्यात येऊन, विद्यार्थ्यांचे शाळा प्रवेश सुरू करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील विभाग निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२९) * ३१७६ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १ हजार १२९ शाळांमधील ९ हजार ४८ शिक्षकांच्या कामगिरीवर लक्ष ठेवण्यासाठी केवळ ९ विभाग निरीक्षक (ब्लॉक ऑफिसर/बीओ) कार्यरत असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षांपासून विभाग निरीक्षकांची भरती न झाल्यामुळे त्याचा परिणाम शाळांच्या गुणवत्ता वाढीवर होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षणाचा दर्जा टिकवणे, शाळांची गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थी आणि शिक्षकांना येणाऱ्या अडचणी सोडविणे, पटसंख्येवर लक्ष ठेवणे अशी महत्वाची कामे ही विभाग निरीक्षकांकडून करण्यात येत असताना गत काही वर्षात मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यामधून पदोन्नतीद्वारे तसेच सरळसेवा भरती अशा पध्दतीने विभाग निरीक्षकांची भरती झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील विभाग निरीक्षकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, त्याचा तपशील काय आहे तसेच सदरहू रिक्त पदे किती कालावधीत भरण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

शाळांच्या गुणवत्ता वाढीवर परिणाम होऊ नये याकरीता सेवाज्येष्ठ मुख्याध्यापकांना निरीक्षक (शाळा) या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

निरीक्षक (शाळा) या संवर्गात सन २००८ मध्ये नव्याने निर्माण केलेली हंगामी पदे सरळसेवेने भरली होती.

पदोन्नतीच्या कोटयातील पदे सन २०२० पर्यंत प्रत्येक भरती वर्षांत भरण्यात आली आहेत. सन २०२२ अखेर अनुसूचिवरील ४२ पदांपैकी ४० पदे भरलेली होती. परंतु सन २०२४ मध्ये १९ निरीक्षक (शाळा) यांचे प्रशासकीय अधिकारी (शाळा) या पदावर पदोन्नती करण्यात आल्यामुळे निरीक्षक (शाळा) या संवर्गातील पदांची संख्या अधिक प्रमाणात रिक्त झाली. त्यानुसार सेवाज्येष्ठ मुख्याध्यापकांना निरीक्षक (शाळा) या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला असून शाळांच्या पर्यवेक्षणाचे कामकाज पार पाडण्यात येत आहे. सद्य:स्थितीत, सन २०२४-२५ या भरती वर्षातील ३५ रिक्त पदे भरण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरू आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील निरीक्षक (शाळा) ही पदे भरण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## चाकण (जि.पुणे) औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३०) * २९५८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) औद्योगिक वसाहत परिसरातील कोरेगाव बुद्रुक ते किवळे दरम्यानचा सहा किलोमीटरचा रस्ता खड्ड्यामुळे पूर्णपणे खराब झाला असून या परिसरातील कडूस ते आंबेठाण या सुमारे २५ किलोमीटरच्या औद्योगिक वसाहतीस जोडणाऱ्या महामार्गाची देखील अत्यंत दुरवस्था झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकण औद्योगिक वसाहतीमधील सर्व रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) सदर रस्ता प्रजिमा दर्जाचा आहे. कडूस ते आंबेठाण या लांबीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) मार्फत ६.३० कि.मी. लांबीत रस्ता सुधारणा करणेचे काम प्रगतीत आहे. उर्वरित लांबीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेळोवेळी देखभाल व दुरुस्तीची कामे करून रस्ता वाहतुकीकरीता

सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.
(२) सा. बां. विभागांतर्गत रस्त्यावर दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे वेळोवेळी करून रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भूमिगत गटार योजनेस होणारा खर्च संबंधित गृहनिर्माण संस्थेंकडून वसुल करण्याबाबत

**(३१) * ३५०७ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भुमिगत गटार योजनेस रुपये २५ हजार शुल्क घेऊन जोडणी देण्याचा निर्णय असतानाही आता महानगरपालिकेने रुपये २५ हजार शुल्क घेऊन जोडणीसाठी होणारा खर्च देखील सोसायटीकडून वसूल करण्याचा नवीन निर्णय घेतला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, यापूर्वी सुमारे ५० टक्के गृहनिर्माण संस्थांनी २५ हजार भरून जोडण्या घेतल्या असताना पुन्हा आता अधिकचा भुर्दंड हा उर्वरित संस्थांवर अन्यायकारक आणि भेदभाव करणारा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिरिक्त खर्च घेण्याचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी आंदोलनाचा इशारा संबंधित गृहनिर्माण संस्थांनी दिला असून शासनाने याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) गृहनिर्माण संस्थांकडून अतिरिक्त खर्च घेण्याचा निर्णय रद्द करावा, अशा आशयाचे निवेदन महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनरूत्थान अभियान (JNNURM) अंतर्गत सोसायटीचे प्रवेशद्वार ते मुख्य मलवाहिनीच्या मॅनहोलपर्यंत मलवाहिनी अंथरण्याचे काम करण्यात आले असून, मिरा-भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. ९९, दिनांक ०१/०२/२०१२ अन्वये रुपये २५,०००/- मलजोडणी शुल्क संबंधित सोसायटीकडून घेण्यात येत होते.

परंतु केंद्र शासनाने सदर अभियान स्थगित केल्याने, सदर कामाचा अर्थिक भार महानगरपालिकेवर होत असल्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता उक्त ठरावात काही सुधारणा करून, मिरा-भाईंदर महानगरपालिकेस नवीन धोरण स्विकारणे आवश्यक होते.

महानगरपालिकेच्या मलजोडणी शुल्का बरोबरच सोसायटीचे प्रवेशद्वार ते मुख्य मलवाहिनीवरील मॅनहोलपर्यंत मलवाहिनी गृहसंकुलाने स्वखर्चाने टाकावी, असे नवीन धोरण महानगरपालिकेमार्फत निश्चित करण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बदलापूर नगरपरिषदेच्या इमारतीत कोरोना कालावधीतील औषधी साठा व इंजेक्शन वापराविना पडून असल्याबाबत

**(३२) * ३६७९ श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (प), (जि.ठाणे) बॅरेज रोड येथील नगरपरिषदेच्या कोंडीलकर इमारतीत कोरोना काळातील वापरात न आलेले साहित्य अद्यापही वापराविना पडून असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळातील वापरात न आलेली कोट्यवधी रकमेची औषधे, ऑक्सिजन सिलेंडर, वैद्यकीय साहित्य, नविन खाटा, गाद्या, बेडशीट, रेमडेसिव्हिर इंजेक्शन, इतर औषधे, व्हेंटिलेटर,ऑक्सिजन मशीन, ऑक्सिजन सिलिंडर इ.साहित्य हे तीन ते चार वर्षांपासून तसेच पडलेले असून तेथील अनेक मशीन्सचा वापर न झाल्याने निधीचा अपव्यय झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिल्लक साहित्याबाबत वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार केला असून संबंधित विभागाकडून काहीच उत्तर आले नसल्याने जिल्हा शल्यचिकित्सकांशी पत्रव्यवहार करुन सदर औषधी साठा त्यांच्याकडे देणार असल्याचे मुख्याधिकारी, नगरपरिषद बदलापूर यांनी सांगितले असले तरी त्याप्रमाणे कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेने कोरोना काळात रुग्ण उपचाराकरीता वापरलेले साहित्य सद्य:स्थितीत त्याची गरज नसल्याने सुरक्षितपणे जतन करुन ठेवले आहे,ही वस्तूस्थिती आहे.

(२), (३) व (४) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने कै.बि.एस. दुबे रुग्णालयाच्या अधिपत्याखाली कोरोना काळात रुग्ण निदान व उपचाराकरीता व्यवस्था केली होती.अतितातडीच्या उपाययोजना करण्याकरीता अनेक प्रकारची परिस्थितीनुरुप अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणे व साहित्य नगरपरिषदेने आवश्यक बाबींची पुर्तता करुन खरेदी केली होती. वापरात न आलेली कोणतीही औषधे शिल्लक नसून रूग्णाकरीता वापरलेले ऑक्सिजन सिलेंडर, वैद्यकीय साहित्य,खाटा, गाद्या, बेडशीट, तसेच, व्हेंटिलेटर, ऑक्सिजन मशीन इत्यादी वैद्यकीय उपकरणे कोरोनाची साथ ओसरल्यानंतर नगरपरिषदेने कोडींलकर मार्केटच्या इमारतीमध्ये सुरक्षित ठेवले आहेत. वैद्यकीय उपकरणे व साहित्य परत देण्याकरीता जिल्हाधिकारी, ठाणे व जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडे पत्रव्यवहार सुरु आहे.

कोरोनाच्या अंतिम चरणात अनेक सेवाभावी संस्था, सहकारी संस्थानी सामाजिक जाणीवेतून विविध प्रकारची वैद्यकीय उपकरणे व साहित्य नगरपरिषदेस दान केले आहे.तत्कालीन परिस्थितीत रुग्णांचा वाढता ओघ पाहता,नगरपरिषदेने काही वैद्यकिय उपकरणे खरेदी केली असून सर्व उपकरणे उपयोगात आणली आहेत. त्यामुळे निधीचा अपव्यय झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील आर्वी-तळेगाव या राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४७A या रस्त्याचे काम निष्कृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(३३) * ४०३६ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील आर्वी-तळेगाव या राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४७A या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे व संथ गतीने होत असल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम (उपक्रम) मंत्री यांना दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता हा आर्वी शहरातून जाणारा मुख्यमार्ग असून या रस्त्याच्या कामाकरीता वापरण्यात येणारे साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे रस्त्याच्या कामाचा दर्जा खालावल्यामुळे रस्त्यावर अपघात व वाहतूक कोंडी होवून तेथील स्थानिकाना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे तसेच सदर कामाची उपअभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता यांचेकडून कोणत्याही प्रकारची पाहणी अथवा तपासणी होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाची राज्यस्तरीय दक्षता व गुण नियंत्रण यांचेकडून कामाची तपासणी करून दोषी कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) वरुड-आष्टी-आर्वी-पूलगांव -वर्धा-सेवाग्राम -सोनेगाव-हिंगणघाट-जांब-वरोरा हा राष्ट्रीय महामार्ग क्र.३४७-अ असून सदर महामार्गाची लांबी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारित येते.

वर्धा जिल्ह्यातील आर्वी-तळेगांव या राष्ट्रीय महामार्ग क्र.४४७-अ या संदर्भात कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) तळेगांव-आर्वी एकूण लांबी १३.७० कि.मी. (कि.मी. ५९/९०० ते कि.मी.७३/६००) मधील सिमेंट कॉक्रीट दुपदरीकरण Paved shoulder सह या कामास रुपये १३१.६३ कोटी किंमतीस दिनांक २०/०६/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत एकूण १३.७० कि.मी. लांबीपैकी १२.२५ कि.मी. लांबीतील काम पूर्ण झालेले आहे. सदर महामार्गाच्या कामाकरीता वापरण्यात आलेले साहित्य योग्य दर्जाचे असल्याबाबत, सर्व चाचण्या घेण्यात आल्या असून Indian Road Congress (IRC) च्या मानकानुसार काम करण्यात आलेले आहे. महामार्गाच्या कामादरम्यान संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी वेळोवेळी कामाची पाहणी केली आहे.

सदर महामार्गाच्या आर्वी शहरातील १.४५ कि.मी. लांबीतील काम वृक्षतोडीच्या परवानगीच्या अनुषंगाने न्यायप्रविष्ट बाबीमुळे अदयाप करण्यात आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील धारावी प्रकल्पाच्या सर्व्हेक्षणात भाग न घेतलेल्या रहिवाशांना अनधिकृत ठरविल्याबाबत

**(३४) * २५८४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत केंद्र व राज्य शासन तसेच अदानी उद्योग समूह यांची एमएमपीडीए कंपनी यांनी केंद्र व राज्य शासन सर्व्हेक्षणात भाग न घेतलेल्या रहिवाशांना अनधिकृत ठरविले असून रहिवाशांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत माहिती व निर्णय घेवून अपात्र ठरविण्यात आलेल्या रहिवाशांना अपीलची मुभा देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत धारावी अधिसुचित क्षेत्रातील झोपडीधारकांचे सर्वेक्षण "महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ अन्वये मार्च, २०२४ पासून सुरु आहे. अद्यापपर्यंत सुमारे ८५,४८४ एवढ्या झोपडीधारकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. या सर्वेक्षणादरम्यान संबंधित झोपडपट्टीधारकांनी सर्वेक्षण पथकास पूर्ण सहकार्य केले आहे. त्याप्रमाणे काही भागात रहिवाशांनी सर्वेक्षणात भाग घेतला नसल्याचे आढळून आले असून, अशा झोपडीधारकांना सर्वेक्षणात भाग घेणेबाबत त्यांचे बरोबर चर्चा सुरु असून त्यांना अनधिकृत ठरविण्याबाबत धारावी पुनर्विकास प्राधिकरणाकडून कोणताही निर्णय घेतलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी महानगरपालिकेने शहरातील कचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी नियुक्त केलेल्या मे.सुप्रिमो गोल्ड इरीगेशन लि.कंपनीने निविदेतील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याबाबत

**(३५) * ३२७२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महानगरपालिकेकडून शहरातील कचरा व्यवस्थापनेचे काम देण्यात आलेल्या मे.सुप्रिमो गोल्ड इरीगेशन लि. या कंपनीकडून निविदेतील अटी व शर्तीनुसार कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक मशिनरीचा वापर न करता जेसीबीच्या सहाय्याने कचरा एका ठिकाणी जमा करण्यात येत असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी / कर्मचारी हे सदर कंपनीशी आर्थिक संगनमत करुन निविदेतील अटी व शर्तीनुसार कोणतीही कामे होत नसतानाही कंपनीच्या कामाबाबत शासनास चुकीचा अहवाल सादर करुन कंपनीस कोटयवधी रुपयांची देयके देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भिवंडी महानगरपालिकेच्या मे.सुप्रिमो गोल्ड इरीगेशन लि. या कंपनीकडून कचरा व्यवस्थापन करण्यासंदर्भात करण्यात आलेल्या कामाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निविदेतील अटी व शर्तीनुसार काम न करणाऱ्या कंपनीच्या मालकावर गुन्हा दाखल करुन त्यांना अदा करण्यात आलेली रक्कम वसूल करुन कचरा व्यवस्थापन करण्याबाबत पुनर्निविदा राबविण्याबाबत तसेच यामध्ये दोषी असलेल्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही.

चाविंद्रा रामनगर प्रक्रिया केंद्र येथे साचलेल्या जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी नियुक्त ठेकेदार यांचेकडून बायोमायनिंग प्रक्रिया करणेकामी स्क्रिनर मशीन,जेसीबी,डंपर व पोकलन इ. मशीनचा वापर होत असून कचरा प्रक्रिया केल्यानंतर विलगीकृत मटेरियल RDF, Inert material व Biosoil यांची वाहतूक करणेसाठी जेसीबी,डंपर इत्यादीचा वापर करण्यात येत आहे.

(२) खरे नाही.

जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणेच्या कामावर देखरेख करणे व झालेल्या कामाच्या नोंदी करणे कामी दोन सत्रामध्ये चार स्वच्छता निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्वच्छता निरीक्षक यांचेमार्फत दैनंदिन जुन्या प्रक्रिया करण्यात येणाऱ्या कचऱ्याच्या वजनाच्या व वजनाच्या चलनाच्या नोंदी रजिस्टर मध्ये अद्ययावत ठेवण्यात येतात. स्वच्छ भारत मिशन अर्बन-२.० करीता नियुक्त असलेले महानगरपालिकेचे यांत्रिकी अभियंता यांचे देखरेख व नियंत्रणाखाली झालेल्या कामाचे परीक्षण करण्यात येते.

तद्नंतर जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे कामी नियुक्त ठेकेदाराकडुन पूर्ण झालेल्या २४,७११.०३ मेट्रिक टन इतक्या कामाचे तांत्रिक लेखापरिक्षण पुणे अभियांत्रिकी शासकीय महाविद्यालय (COEP), पुणे या त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येते. त्यांच्याकडून काम गुणवत्तापूर्वक झाले असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधित ठेकेदारास पहिले धावते देयक रुपये १,०१,५५,८९०/- इतके दिनांक २४/०७/२०२४ रोजी अदा करण्यात आलेले आहे.

(३) खरे आहे.

(४) भिवंडी महानगरपालिकेकडून शहरातील कचरा व्यवस्थापनाचे काम देण्यात आले आहे.त्यांनी केलेल्या कामाचे शासन निर्णयानुसार त्रयस्थ संस्थेमार्फत (COEP), पुणे लेखापरीक्षण केल्यानंतरच त्यांच्या अहवालानुसार देयक अदा करण्यात येते.त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-शिळफाटा मार्गावरील मेट्रोच्या कामामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याबाबत

**(३६) * ४१४० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-शिळफाटा मार्गावर मेट्रोचे काम सुरू असून ठेकेदारांच्या नियोजनाअभावी वाहतूक कोंडी होत असून मानपाडा आणि काटई परिसरात १ कि.मी. पर्यंत वाहनांच्या रांगा लागत असल्याने नोकरदारवर्ग तसेच शाळेचे विद्यार्थी वेळेवर पोहोचू शकत नसल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मेट्रोच्या कामांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे विद्यार्थ्यांना अनेक समस्या उद्‌भवत असून, विद्यार्थी शाळेत पोहचू शकत नसल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-शिळफाटा मार्गावर सुरु असलेले मेट्रोचे काम तर दुसरीकडे संथगतीने सुरु असलेले पलावा जंक्शन वरील पुलाचे काम या दोन्ही कामांमुळे पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे महामार्गाच्या दुर्तफा रहाणाऱ्या रहिवाशांसह नागरिक, रुग्णवाहिकेमधील रुग्ण, वाहनचालक तसेच शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाहतूक कोंडींच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाहतूककोंडी कमी करण्याच्यादृष्टीने सदरहू काम तातडीने व नियोजनबध्द पध्दतीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्रकरणी दोषी असलेल्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) एमएमआरडीएमार्फत कल्याण-शिळफाटा मार्गावर कल्याण ते तळोजा या मेट्रो मार्ग क्र १२ प्रकल्पाचे काम सुरु आहे. सदर प्रकल्प हा माहे डिसेंबर, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. सदर मेट्रो चे काम छत्रपती शिवाजी महाराज चौक, कल्याण ते मानपाडा दरम्यान रस्त्याच्या मधोमध दुभाजकावर सुरु आहे. सदरहू मेट्रो मार्गिकेच्या कामाकरीता मानपाडा चौकात संरक्षित पत्रे (बॅरिकेट्स) लावल्याने दिनांक २६/०३/२०२५ रोजी सकाळच्या वेळेस मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. तथापि, वाहतुकीस अडथळा होत असलेले संरक्षण पत्रे काढून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

(३), (४) व (५) पलावा जंक्शन येथे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुल काम प्रगतीत असून शिळफाटा ते कल्याण (डव्या बाजूकडील) उड्डाणपुलाचे काम ९९ टक्के काम पूर्णझाले असून ते लवकरच वाहतूकीसाठी सुरु करण्याचे नियोजन आहे व कल्याण ते शिळफाटा (उजव्या बाजुकडील) पुलाचे काम ६० टक्के पूर्ण झाले असून माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

कल्याण शिळ रस्त्यावर पत्री पुल व रुणवाल चौक दरम्यान मेट्रो मार्गिकेच्या संरेखनामध्ये संरक्षणाच्या दृष्टीने संरक्षण पत्रे लावल्याने अस्तित्वातील रस्ता वाहतुकी करीता अरुंद झाल्याने सकाळ व संध्याकाळच्या वर्दळीच्या वेळी वाहतूक संथ गतीने चालते यावर उपाययोजना म्हणून पोलीस वाहतूक

विभागामार्फत २ अधिकारी, १२ अंमलदार, २० वॉर्डन यांच्यामार्फत वाहतुकीचे नियोजन करुन वाहतूक सुरळीत ठेवण्याचे नियोजन करण्यात येत आहे. तसेच मेट्रो मार्गाचे स्थापत्य काम पूर्ण झालेले आहे अश्या ठिकाणचे संरक्षित पत्रे आत मध्ये घेऊन अतिरिक्त जागा वाहतुकीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदरहू मेट्रो प्रकल्प हा लवकरात लवकर पूर्ण करुन या भागातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयाच्या (के.ई.एम.) विस्तारीकरणाबाबत

**(३७) * ३१७७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ३ प्रमुख रुग्णालयांपैकी परळ (मुंबई) येथील राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयाच्या (के.ई.एम.) विस्ताराचे काम हे गत ८ वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत सदर रुग्णालय हे जवळपास १५ हजार चौ.फू. जागेत वसलेले असून या रुग्णालयाच्या विस्तारीकरणाचे काम केल्यास जवळपास ६० हजार चौ.फू. जागा उपलब्ध होणार असून सद्य:स्थितीत रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांपेक्षा जवळपास तीन ते चार पट रुग्णांना या ठिकाणी उपचार घेणे शक्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयाच्या इमारतीचे विस्तारीकरण करताना या ठिकाणी हेलिपॅड, डॉक्टर, नर्सेस व इतर वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता निवासी इमारती उभारून आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्याचा तपशील काय आहे, सदरहू रूग्णालयाच्या विस्तारीकरणाचे काम शासन किती कालावधीत पूर्ण करणार आहे तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती व शासनाची भूमिका काय आहे,

(५) असल्यास, सदरहू रुग्णालयाच्या विस्तारीकरणाचे काम गत ८ वर्षांपासून प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत तसेच या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राजा एडवर्ड स्मारक रुग्णालय महत्वाचे प्रमुख रूग्णालय व वैद्यकीय कॉलेज असल्याने तेथे येणाऱ्या रूग्णांना मिळणाऱ्या वैद्यकीय उपचाराची गुणवत्ता वाढविण्याकरीता तसेच जलद व उत्तम उपचार प्रदान करण्यासाठी व शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सदर रूग्णालयाच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव टप्या-टप्याने केले जात आहे.

याअंतर्गत शताब्दी इमारत क्र. १ ह्या तळ मजला + १६ मजली बहुमजली इमारतीचे काम प्रगती पथावर आहे.

तसेच, अस्थिव्यंग इमारतीच्या परिसरात कर्मचारी भवन ह्या तळमजला + २१ मजली इमारतीच्या कामाचे भूमी पुजन झालेले आहे.

नर्सिंग स्कुल आणि हॉस्टेलच्या प्लॉटवर तळमजला + २९ मजले +३ पोडीयम पार्किंग इमारत प्रस्तावित आहे.

तसेच आयुष्यमान शताब्दी टॉवरची निर्मीतीदेखील प्रस्तावित आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

केईएम रुग्णालयाच्या मुख्य रूग्णालयाच्या आवाराचे क्षेत्र.४१८०६.३५ चौ.मी. (४,५०,००३.५५ चौ.फू.) इतके आहे.

तसेच, सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर ५०० आतिरिक्त रुग्णांसाठी खाटा उपलब्ध होतील व इतर अत्याधुनिक सुविधा रूग्णांना पुरवता येतील.

(३) आवश्यकतेनुसार व जागेच्या उपलब्धतेच्या अनुषगांने केईएम रुग्णालय परिसरात रूग्णालयाच्या कर्मचाऱ्यासाठी सदनिका, नर्सिंग स्कुल व हॉस्टेल कर्मचारी निवास व बहुमजली "आयुष्यमान शताब्दी टॉवर" यांचे नियोजन करून आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यात येत आहेत.

"आयुष्यमान शताब्दी टॉवर" आणि सदर टॉवरच्या गच्चीवर हेलीपॅडची सुविधा उभारण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) शताब्दी इमारत क्र. १ ह्या तळ मजला + १६ मजली बहुमजली इमारतीचे काम जून २०२६ पर्यंत होणे अपेक्षित आहे. त्याच बरोबरीने या रुग्णालय परिसरातील इतर पुनर्विकास कामे देखील कार्यान्वित करण्यात येत आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेऐवजी जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याच्या मागणीबाबत

**(३८) * २९८४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या जुन्या निवृत्तीवेतन योजनेच्या मागणीवर पर्याय म्हणून शासनाने गत वर्षी सुधारित निवृत्तीवेतन योजना लागू करण्याच्या केलेल्या घोषणेप्रमाणे नव्या योजनेत सहभागी होण्यासाठी आवश्यक नाव नोंदणी करण्यासाठी शासनाने अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मुदतवाढ दिली असून दिनांक ३१ मार्चपर्यंत विकल्प निवडीसाठी मदतवाढ देण्यात आली असून या योजनेबाबत स्पष्टता नसल्याने अधिकारी / कर्मचाऱ्यांनी जुन्या निवृत्तीवेतन योजनेचा आग्रह कायम ठेवल्याची माहिती कर्मचारी महासंघाने दिली असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकारी महासंघाने राज्यातील अधिकाऱ्यांचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न केले असता सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेऐवजी जुनी निवृत्तीवेतन योजना योग्य असून ती लागू करण्यासाठी महासंघाने शासनाकडे आग्रह धरावा अशा सूचना अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, अंशत: खरे आहे.

वित्त विभागाच्या दिनांक २०/०९/२०२४ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित निवृत्तिवेतन योजना दिनांक ०१/०३/२०२४ पासून लागू करण्याचा तसेच केंद्र सरकारने घोषित केलेल्या UPS (Unified Pension Scheme) शासकीय कर्मचाऱ्यांना जशीच्या तशी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर सुधारीत निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत सादर करावा अश्या सूचना देण्यात आल्या आहेत. तद्नंतर सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी द्यावयाच्या विकल्पाची मुदत शासन निर्णय दिनांक २८/०३/२०२५ अन्वये एक वर्षापर्यंत म्हणजेच दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. कर्मचारी महासंघाने फक्त सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प देण्यास मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ द्यावी असे निवेदन केले होते. त्यास अनुसरुन वरीलप्रमाणे मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेऐवजी जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्यासंदर्भात आग्रह धरावा अशी सूचना राज्य शासनातील कोणत्याही अधिकाऱ्यांनी दिल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.